अदृश्य कष्टकरी तरूण ग्रामीण स्त्रिया

ऊसतोड कामगार आणि आदिवासी शेतमजूर कुटुंबातील
तरूण स्त्रियांचे जीवन समजून घेताना

पार्श्वभूमी

ग्रामीण भागातल्या तरूण स्त्रियांच्या जीवनाचे प्रातिनिधिक चित्र मांडणारी ही फोटो मालिका सोपेकॉम संस्थेने केलेल्या एका अभ्यासाचा भाग आहे. हा अभ्यास महाराष्ट्रातील बीड आणि नंदूरबार या तुलनेनं कमी विकसित जिल्ह्यात, मकाम या राष्ट्रीय नेटवर्कच्या सदस्य संस्थांच्या सहाय्याने करण्यात आला. सरकारच्या आणि धोरणकर्त्यांच्या नजरेतून सुटलेला एक महत्त्वाचा समाजघटक म्हणजे ग्रामीण तरूण स्त्रिया - यंग विमेन - साधारण १५ ते २९ वर्षे वयोगटातल्या मुली व स्त्रिया.

हा एक वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक समूह आहे. तो एकजिनसी नाही. यात विविध जात, धर्म, समूहातील विवाहित-अविवाहित, शाळेत शिकणाऱ्या, शाळा सोडलेल्या अन् शेतमजुरी वा अन्य मजुरी/रोजगार करणाऱ्या, शाळा/कॉलेज शिकत मजुरी करणाऱ्या या व अशा विविध प्रकारच्या स्त्रिया येतात. बहुतेकजणी घरकामाला हातभार लावत गावात मिळेल तो रोजगार करत राहतात. त्यांना ना शिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळते ना रोजगारात पुढे जाण्यासाठी गरजेचं कौशल्य शिक्षण. सामाजिकदृष्ट्या उपयुक्त असलेल्या या समूहाच्या उत्पादक श्रमांची साधी दखलही घेतली जात नाही. ही परिस्थिती आणि या समूहाच्या गरजा व अपेक्षा समोर येणं, त्याला उद्देशून धोरणं आणि योजनांची आखणी होणं महत्त्वाचं आहे. याच हेतूनं सोपेकॉम संस्थेनं हा अभ्यास हाती घेतला.

हा अभ्यास आणि फोटो मालिका म्हणजे या तरूण स्त्रियांच्या जीवनात डोकावून पाहण्याचा एक प्रयत्न आहे. त्या काय करतात? त्यांच्या अपेक्षा काय आहेत? शिक्षणाच्या, रोजगार कौशल्याच्या कोणत्या संधी त्यांना हव्या आहेत? त्यांची स्वप्नं काय आहेत? हे प्रश्न घेऊन आम्ही त्यांच्याशी संवाद साधला. शिक्षण व रोजगार ह्या ग्रामीण भागातल्या कळीच्या प्रश्नांवर अधिक भर दिला, त्यांना या मुलींच्या दृष्टिकोनातून बघण्याचा प्रयत्न केला. व्यापक सामाजिक-सांस्कृतिक आणि आर्थिक संदर्भाने ग्रामीण तरूण स्त्रियांची परिस्थिती समोर आणणारा हा अभ्यास व फोटो मालिका या समस्यांतून मार्ग काढण्यासाठी मदतकारक ठरेल अशी आम्हाला आशा आहे.

अभ्यासाचे मुख्य बिंदू

- **वयोगट**: १८-२५ वर्षे
- **जिल्हे**: वडवणी तालुका, बीड, मराठवाडा आणि शहादा तालुका, नंदूरबार, उत्तर महाराष्ट्र
- **अभ्यास विषय**: उपजिविकेची साधने, समस्या व आव्हाने, असलेली कौशल्ये व ती विकसित करण्याच्या संधी, आशाआकांक्षा व भविष्यातील स्वप्ने
- **डेटा संकलन साधने**: फोटो दस्तऐवजीकरण, गटचर्चा, वैयक्तिक मुलाखती, महिलांचा दिवस समजून घेणे आणि निरीक्षणे. राष्ट्रीय व राज्य शासनाच्या अधिकृत संकेतस्थळांवरून उपलब्ध आकडेवारी.

तरूण स्त्रियाः एक दुर्लक्षित समूह

भारतात तरूण स्त्रिया (१५-२९) हा एक महत्त्वाचा समाजघटक असून एकूण लोकसंख्येतील त्यांचे राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरचे प्रमाण २६% आहे (PLFS २०२०-२१).

'मुलगी शिकली, प्रगती झाली' ही घोषणा प्रचलित असली तरी प्रत्यक्षात मुलींच्या शिक्षणाला फारसं महत्त्व दिलं जात नाही हे वास्तव उपलब्ध आकडेवारीतून स्पष्ट होतं. प्राथमिक वर्गात दाखल होणाऱ्या एकूण मुलींपैकी साधारण ५०% मुली माध्यमिक वर्गात पोहोचेपर्यंतच शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकल्या जातात. शिक्षण थांबून घरी राहिल्या की एकतर त्यांचं लग्न लावून दिलं जातं किंवा त्यांना शेतमजुरीला पाठवलं जातं.

एकंदरीतच तरूण स्त्रिया हा कष्टकरी, असंघटित क्षेत्रातील एक मोठा दुर्लक्षित समूह आहे असं म्हणता येईल. असा समूह जो आपला आवाज मांडू शकत नाही आणि ज्याच्यापर्यंत शिक्षणाच्या अन् कौशल्य विकासाच्या संधी पोहोचत नाहीत. स्वत:च्या आयुष्याचे निर्णय घेण्याचा अधिकारदेखील त्यांना नाही. त्यांनी काय शिकावं, कधी लग्न करावं, काम काय करावं इत्यादी सगळे निर्णय त्यांच्या वतीने इतरांकडून घेतले जातात. पितृसत्ताक व्यवस्थेची घडी विस्कटू नये यासाठी दिलेल्या मार्गानं पुढं जायचं बाळकडूच जणू त्यांना दिलं जातं. मुलींनी आपली स्वप्नं आणि आशाआकांक्षांचा बळी देत दुसऱ्यांची मर्जी राखत जगलं पाहिजे हे बालवयापासून त्यांच्यावर ठसवलं जातं.

तरीही व्यवस्थेला धक्के देण्याचं कामही या ना त्या प्रकारे होत असतं. काही तरूण स्त्रिया परिस्थिती भेदू पाहतात. मार्ग शोधतात. आपली स्वप्नं खरी होतील वा नाही याची कसलीही शाश्वती नसतानाही ती बघण्याचं धाडस करतात. त्यांच्या या धडपडीची दखल घेऊन पोषक परिस्थिती निर्माण केली तरच त्यांच्या आशाआकांक्षा पूर्ण होऊ शकतील. शिक्षण, रोजगार आणि सन्मानाने जीवन जगण्याचा त्यांचा हक्क केवळ कागदावर राहायला नको, प्रत्यक्षात उतरायला हवा. ही जबाबदारी सरकार, धोरणकर्ते, स्वयंसेवी संस्था, शिक्षणतज्ज्ञ आणि सर्व समुदायाची असून ग्रामीण तरूण स्त्रियांची परिस्थिती बदलण्यासाठी योग्य धोरणं असणं आणि त्यांची चोख अंमलबजावणी होणं गरजेचं आहे.

अभ्यासाचे ठळक निष्कर्ष - शिक्षण, घरकाम, उपजिविका आणि आशाआकांक्षा - या चार परस्परसंबंधित विषयांना धरून खाली दिले आहेत.

शिक्षणातले अडसर

ग्रामीण मुलींसाठी शिक्षण ही एक अडथळ्यांची शर्यत ठरते. मुलींसाठी लग्न, घरकाम अशा बाकी गोष्टी अधिक महत्त्वाच्या मानल्या गेल्याने त्यांचं शिक्षण बाजूला पडतं. शाळेत नाव घातलं तरी नियमित उपस्थिती राहील याची शाश्वती नसते. कधी घरातल्या जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी तर कधी शेतमजुरीसाठी शाळा बुडते. शिकण्यात खंड पडतो. शाळेत जाणं अनियमित झालं की शाळेत शिकवलेलं समजत नाही आणि शिकण्याची गोडी संपते. अशा मुली शाळाबाह्य होतात आणि घरच्या अधिकाधिक जबाबदाऱ्या सांभाळू लागतात.

एक दिवस शाळेला तर दहा दिवस कामाला असं शिकणं चालू होतं. मग शिकणार कसं आम्ही?

ही व्यथा आहे मंदाणा गावातल्या आदिवासी मुलीची.

अडसर ओलांडत शालेय शिक्षणाचा कठीण टप्पा पूर्ण करण्याऱ्या मुलींना पुढे शिकायची आस असते. पण उच्च शिक्षणाकडे जाणारी वाट तर आणखीनच बिकट आहे. शालांत शिक्षणानंतर करायचे कोर्सेस किंवा महाविद्यालयीन शिक्षण गावांमध्ये उपलब्ध नसते. त्यासाठी बाहेरगावी जायचं तर घरून परवानगी मिळण्याची शाश्वती नाही. रोजचा प्रवास, त्याचा खर्च, मुलींची सुरक्षितता अशा अनेक कारणांसाठी पालक मुलींना बाहेरगावी पाठवायला तयार नसतात.

बस वेळेत येत नाही. कधी कधी तर दोन दोन तास थांबायला लागतं. म्हणून घरचे गावाबाहेर शिकायला पाठवतच नाहीत. मुलींना नाही पाठवत, पण गावातली काही मुलं जातात तालुक्याला शिकायला.

- वडगाव, शहादा मधील आदिवासी मुलगी

मला डॉक्टर व्हायचंय, पण घरचे मला तेवढं शिकायला देतील का कळत नाही. आई म्हणते, हे जग बेक्कार आहे आणि पोरीचं लग्न जितकं लवकर करू तितकं चांगलं! ते जे ठरवतील ते मला ऐकायलाच लागेल

- वडवणी तालुक्यातल्या पिंपरखेड गावातील दलित मुलगी

बीड जिल्ह्यातल्या पिंपरखेड गावातली **शिल्पा**. चार भावंडातली सगळ्यात थोरली. कॉम्प्युटर ॲप्लिकेशन शिकणारी शिल्पा कुटुंबातली पहिली पदवीधर व्यक्ती असेल. तिचा आदर्श समोर असल्याने धाकट्या भावंडांनाही शिकायची गोडी लागली आहे. पण घरची परिस्थिती हलाखीची. आईवडील दोघे सहा महिने ऊसतोडीला जातात आणि बाकी महिने मिळेल ती शेतमजुरी करतात. त्यांच्या माघारी घरचं सगळं सांभाळून, भावंडांची काळजी घेत शिल्पा तिचा अभ्यास करते.

शिल्पा सांगते, गावात ना पुढच्या शिक्षणाच्या संधी आहेत, ना त्यासाठी मार्गदर्शन करणारं कुणी आहे. युट्यूबवरून तिला बीडच्या कॉलेजातील कॉम्प्युटर ॲप्लिकेशनची माहिती झाली. गावातून बीडपर्यंत रोज ये-जा करायची म्हणजे रोजचा दोन तासांचा प्रवास आणि महिन्याचा पाचशे-सहाशे रूपये तिकीटाचा खर्च.

जर गावात शिकायच्या संधी असत्या तर माझा प्रवासाचा वेळ आणि खर्च वाचला असता. तेवढाच खर्चाचा भार तरी कमी झाला असता,

असं तिला वाटतं.

कौटुंबिक, सामाजिक बंधनांप्रमाणेच शिक्षणव्यवस्थेतील त्रुटीही मुलींच्या समस्यांमध्ये भर घालतात. शैक्षणिक गुणवत्तेपासून शिक्षणाच्या खाजगीकरणापर्यंत अनेक समस्या बहुसंख्य मुलामुलींच्या शिक्षणाला मारक ठरताहेत. शिक्षण इतकं महाग झालं आहे की बऱ्याचजणी मनातली शिकायची इच्छा मनातच ठेवतात. पुढचं शिक्षण आपल्या कुटुंबाच्या आवाक्यातलं नाही हे लक्षात आल्यावर त्या शिकण्याचा विचार सोडून देतात. शिकायला उत्सुक असलेल्या मुलामुलींना सहज शिकता येईल असे अभ्यासक्रम व शुल्करचनेचं धोरण असणं गरजेचं आहे.

आज उपलब्ध असलेल्या शिक्षणाची गुणवत्ता योग्य आहे का, हादेखील मोठा प्रश्न आहे. कॉलेज शिक्षण घेणाऱ्या काही मुलींनी आम्हाला सांगितलं की त्यांनी प्रवेश घेतला असला तरी त्या कॉलेजला नियमितपणे जात नाहीत. का जात नाही असं विचारल्यावर त्या म्हणाल्या, 'आम्ही रोज गेलं पाहिजे असं कॉलेजलाही वाटत नाही', आणि 'आम्ही गेलो तरी क्लासेस होत नाहीत.' म्हणजे कॉलेजमध्ये शिकवलंच जात नाही, विद्यार्थ्यांनी आपापला अभ्यास करावा ही अपेक्षा असते आणि कॉलेज केवळ परीक्षा केंद्र म्हणून काम करतात. पालकांनादेखील ही परिस्थिती माहिती आहे, पण त्यांच्या लेखीही मुलीचं शिक्षण महत्त्वाचं नाही, तर डीग्री मिळाली की काम झालं. हातात पदवी असेल तर लग्न जमवायला उपयोगी ठरतं या व्यावहारिक विचारानं ते मुलींना कॉलेजला जाऊ देतात. तिनं शिकून पुढे जावं ही त्यांचीही अपेक्षा नसते.

मुली वयात आल्या की त्यांच्या लग्नाचे वेध घरच्यांना लागतात. जर शिक्षण चालू असेल आणि मुलीनं शिकायचा हट्ट केला, 'शिक्षण संपेपर्यंत लग्न नको' म्हटलं तर पालक काही काळ जरूर थांबतात, पण योग्य वराचा शोध चालूच असतो. तसं त्यांच्या मनासारखं स्थळ मिळालं तर मुलीला काहीही सांगून, पटवून देऊन लग्नाला उभं केलं जातं. मुलींनी आम्हाला सांगितलं, 'आई-वडील सांगतात की शिकायला कोण नाही म्हणतय, लग्नानंतर शिकत रहा की.' मुलाकडचे लोकही त्यांच्या म्हणण्याला होकार देतात. पण एकदा लग्न झालं की कोणीच या आश्वासनाची आठवण ठेवत नाही. लग्नानंतर बहुतेकींचं शिक्षण थांबतच. हे लग्नानंतरच्या शिक्षणाचं वास्तव त्यांना परिचित होतं. पण नवरा व सासरच्यांनी दिलेला शब्द फिरवला तर त्याविरोधात उभ्या राहणाऱ्या आरतीसारख्या काही जणी आहेत, हाही एक आशेचा किरण आहे.

घरचे लोक पाहिजे तोवर थोडंच शिकून देणार आहेत! त्यांना तर लग्नाची घाई झालेली असते. आम्हाला वाटलं तरी ते शिकू द्यायला तयार नसतात.

हा अनुभव आहे बीडच्या चिंचाळामधील ऊसतोड कामगारांच्या कुटुंबातील मुलीचा.

शिकायला खूप पैसा लागतो. तो खर्चून शिक्षण पूर्ण केलं, तरी परत नोकरी मिळवायला एक-दोन लाख द्यावे लागतात. इतका पैसा कुठून आणणार? शिकून जर चांगलं काम मिळणार नसेल तर शिकून तरी काय उपयोग आहे?

असं मंदाणा गावातल्या भिल्ल समाजातल्या मुलीचं म्हणणं आहे.

शहाद्यातील मंदाणे गावात आम्हाला भेटलेली आरती दहावीची परीक्षा द्यायची तयारी करत होती. अभ्यास सांभाळून ती आई-वडिलांसोबत शेतमजुरीलाही जायची. लहान असल्यापासूनच ती त्यांच्या सोबत जायला लागली. जेव्हा गावात काम नसायचं तेव्हा सगळेजण चाळीसगावला जायचे, तिथं कापूस वेचायचं काम मिळायचं. ते संपलं की सगळे गावात परतायचे आणि आरती शाळेला जायची. पण दरम्यान शाळा बुडल्यामुळे शाळेत काय शिकवताहेत हे समजायलाही कठीण जायचं.

कधी दोन तर कधी तीन महिन्यांची गॅप पडायची. पुन्हा शाळेत जायला लागल्यावर वर्गातलं काहीच समजायचं नाही.

तिच्यातल्या शिकण्याच्या अपार उर्मीनं याही अडचणीवर मात करत शिक्षण चालू ठेवलं. कसंही करून आपण दहावी पूर्ण करायचं असं तिनं मनोमन ठरवलेलं होतं. त्यानंतर नर्सिंगचा कोर्स करायचं हेही तिनं ठरवलंय.

या दरम्यान तिनं एका मुलाबरोबर लग्न ठरवलं. 'तुला नर्सिंग शिकायला पाठवेन' असं त्यानं लग्नाआधी सांगितलं. पण लग्नानंतर तो बदलला. पुढं शिकवलं नाही. तिच्या इच्छेचा मान कुणीच राखला नाही. ना दारूच्या आहारी गेलेल्या नवऱ्यानं ना सासूसासऱ्यांनी.

लग्नानंतर सगळं बदललं. बाहेर जाणं बंद केलं, कुणाकडं मान वर करून बघायची चोरी होती. आईवडिलांकडे मनाप्रमाणे वागता येतं, तिथं तसलं काही नव्हतं.

आरतीला असं जीवन नको होतं. नवऱ्याचं घर सोडून ती आईवडिलांकडे आली आणि तिनं आपलं शिक्षण चालू ठेवलं.

आधी तिला शिक्षक व्हावं असं वाटायचं. पण शिक्षणात खंड पडला तेव्हा तो विषय सोडून तिनं नर्सिंगचा पर्याय स्वीकारला. बारावीनंतर नर्सिंग डिप्लोमा करता येईल एवढंच तिला आत्ता माहिती असलं तरी नातेवाईकांकडून बाकी माहिती घेऊन कोर्स करायचा हा तिचा निर्धार पक्का आहे.

लहान वयापासून घरकामाचा बोजा

मुलींसोबतच्या मिटींगमध्ये आम्ही 'डिसमँटलिंग पॅट्रीआर्की' ही फिल्म दाखवायचो. एकाच कुटुंबातली मुलगी अन् मुलगा यांचा दिनक्रम या फिल्ममध्ये दाखवला आहे. मुलगी घरातली रोजची कामं करतेय, आईला मदत करतेय आणि भावाला शाळेसाठी तयार व्हायलाही मदत करतेत. मुलगा मात्र घरात काहीच काम करत नाही आणि शाळेसाठी निघून जातो. घरकामात बुडालेल्या त्याच्या बहिणीच्या मनातही शाळेत जायची इच्छा आहे, मात्र तिला जाता येत नाही. जेव्हा तिला विचारलं जातं की तुला काय करायचंय तेव्हा ती म्हणते, 'मला डॉक्टर व्हायचंय!'

समाजात सर्वसाधारणपणे दिसणाऱ्या परिस्थितीचं चित्रणंच या फिल्ममध्ये असल्यानं मुलींना ही फिल्म आवडायची आणि त्यानंतरची चर्चाही अधिक मोकळेपणानं व्हायची. जमलेल्या तरूण स्त्रियांचं जीवनंही साधारण फिल्ममधल्या मुलीसारखंच होतं आणि त्या आपले अनुभव सांगायच्या. त्यांचा दिवसही घरकामात बुडलेला असायचा, शिवाय घरकाम ही बाईचीच जबाबदारी असते असंही त्यांनी मनोमन मानलेलं होतं. त्यामुळे भाऊ घरातलं काम करत नाही यात काही वेगळं आहे असं त्यांना वाटत नव्हतं.

अगदी लहान वयापासून मुलींना त्यांची बाईपणाची कर्तव्यं पार पाडायला तयार केलं जातं. परिणामी घरकामाची विषम विभागणीही त्यांच्या अंगवळणी पडून जाते.

लहान वयात आईच्या हाताखाली मदत म्हणून घरकामाची सुरुवात होते. हळूहळू मुली सगळंच घरकाम करू लागतात. शिकत असतील तर शाळेच्या वेळा सांभाळून आणि कामावर जात असतील तर शेतमजुरी सांभाळून घरातली कामं करणं ही जणू मुलींचीच जबाबदारी मानली जाते.

मी चुला पेटवते, भांडे घासते, कपडे धुते, भाजी भाकर रांधते आणि कामाला जाते. या कामाशिवाय बाईचं बाकी काय असतंय?

हा प्रश्न मंदाणा गावातल्या भिल्ल आदिवासी मुलीचा.

घरकाम मीच करते. चौथीत होते तेव्हापासूनच काम करते. भाऊ कोणत्याच कामाला हात लावत नाही.

मंदाणा गावातल्या तरूण मुलीचा अनुभव.

उपजिविकेचे मर्यादित पर्याय

ग्रामीण तरूण स्त्रियांच्या बाबतीत घरकामाच्या जबाबदारीचा पुढचा टप्पा म्हणजे शेतमजुरी. घरची शेती असेल तर विनावेतन आणि बाहेरच्या शेतकऱ्याकडे मजुरी केली तर सवेतन काम. अगदी लहान वयापासून मुली शेतमजुरी करू लागतात. लहान असताना मजुरीला जाणाऱ्या आईवडिलांसोबत जाणाऱ्या या मुली पुढे स्वत:ही शेतमजुरी करू लागतात. सतत हेच काम पाहिलेलं असल्यानं शेतमजुरी करायला त्यांना जड जात नाही. पण त्यामुळे शिक्षण किंवा कामाची इतर कौशल्ये शिकण्याचे पर्यायही त्यांच्या वाट्याला येत नाहीत.

लावणी, निंदणी अशी शेतीतली काही कामं ही स्त्रियांचीच कामं मानली जातात. या हंगामी कामांसाठी मुली कुटुंबासोबत जातात, त्या काळात त्यांची शाळा बुडते. पण लहान मुलीही मजुरी करून शंभर-दीडशे रूपये मजुरी कमावतात, त्यामुळे त्यांना सोबत नेलं जातंच. कमी मजुरीत काम भागतं असल्यानं शेतकरीही त्यांना कामावर घेतात.

लहान वयापासून याच कामात असल्याने तरूण स्त्रियांना शेतीतली कामं चांगली जमतात. पण ही कौशल्याची कामं मानली जात नाही केवळ मजुरीची कामं म्हणून पाहिली जातात. शालेय शिक्षण व नवी कौशल्यं शिकायची संधी त्यांना मिळत नाही, तसंच अनुभवातून शिकलेल्या त्यांच्या कामांना कुशल काम मानलं जात नाही. खरं तर त्यांच्याकडील कौशल्यांचा विकास होणं हे नवी कौशल्यं शिकण्याइतकंच महत्त्वाचं असून त्यासाठी शासकीय कार्यक्रम असायला हवा.

राष्ट्रीय स्तरावरील ग्रामीण स्त्रियांच्या रोजगाराची सद्यस्थिती (PLFS २०२०-२१) या अभ्यासानुसार बहुसंख्य (६४.८%) ग्रामीण स्त्रिया स्वरोजगार करणाऱ्या आहेत. पण कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या अभावी स्वरोजगारातील बऱ्याच स्त्रिया व तरूण स्त्रियांना विनावेतन शेतमजुरीचे काम करणे भाग पडते.

सरकारच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या कौशल्य विकास कार्यक्रमाचा लाभ या सामाजिक गटालाही मिळायला हवा. पण या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचतदेखील नाहीत. महाराष्ट्र सरकारच्या वेबसाईटवर उपलब्ध आकडेवारीनुसार, २०२१ - २२ या वर्षात एकूण ८३७१ केंद्रांतून ज्या विविध रोजगार योजना राबवल्या त्यातील एकूण लाभार्थींपैकी जवळपास ५६% (एकूण ७७१६४६ लाभार्थींपैकी ४३८७८२) लाभार्थी स्त्रिया आहेत. ही आकडेवारी पाहून प्रश्न पडतो की जर एवढ्या मोठ्या प्रमाणावर स्त्रियांना प्रशिक्षण मिळत असेल तर प्रशिक्षणानंतर त्यांना रोजगार मिळाला का आणि मिळाला असेल तर तो किती काळासाठी मिळाला, दीर्घ काळ टिकून राहिला का? या प्रश्नांची उत्तरं मिळायला हवीत. बीड आणि नंदुरबारमध्ये अभ्यासादरम्यान जी परिस्थिती दिसली तिथे संधींचा अभाव जाणवला. तिथलं चित्र या सरकारी आकडेवारीपेक्षा खूप वेगळं आहे.

ज्या तरूण स्त्रिया पुढे शिकू शकतात, त्यांच्या जीवनाची दिशा काहिशी बदलते. शिक्षणामुळे त्यांची स्वप्न बदलतात, अधिक मोठी होतात. घेतलेल्या शिक्षणाच्या बळावर सुरक्षित पगारी नोकरी मिळावी असं त्यांना वाटतं. याशिवाय आणखी शिकावं आणि नवी कौशल्यं आत्मसात करावी अशीही त्यांची इच्छा असते. पण स्थानिक पातळीवर मर्यादित आणि मोजके पर्यायच उपलब्ध आहेत. शिलाई कामाशिवाय इतर कोणतंही कौशल्यविकास प्रशिक्षण गावांमध्ये उपलब्ध नसल्याचं आम्हाला दिसून आलं.

बीडमधील चिंचाळामध्ये बारावीत शिकणाऱ्या मुलीला वाटतं,

गावात निदान करिअर मार्गदर्शनाची सोय असायला हवी. शिकायचे कोणकोणते पर्याय उपलब्ध आहेत हे तरी आम्हाला त्यामुळे समजेल.

दडपलेल्या आशाआकांक्षा

या ग्रामीण तरूण स्त्रिया कामाच्या चक्रात अडकलेल्या आहेत. इतर मुलींबरोबर खेळणं किंवा स्वत:साठी थोडा मोकळा, फुरसतीचा वेळ काढणं हीदेखील त्यांच्या लेखी फार मोठी गोष्ट आहे. शालेय शिक्षण थांबलं की त्यांचं बाहेर खेळणंही संपून जातं आणि त्यांचा सगळा वेळ घरकाम व शेतमजुरीमध्ये जातो. असे दैनंदिन एकसुरी जगतानाही मागे टाकलेली स्वप्नं, इच्छा आकांक्षा कधी ना कधी वर डोकावतात.

कबड्डी हा सुमनचा आवडीचा खेळ. शाळेत होती तोवर ती खूप खेळायची. शाळा सुटली तशी खेळणंही बंद झालं. सुमन सांगते गावातल्या बाकी मुली कुणी खेळत नाही. कबड्डी हाफ पँटवर खेळावी लागते. त्यामुळं लोक नावं ठेवतात. त्यांना वाटतं मोठ्या झाल्यावर मुलींनी खेळू नये. सुमन आणि तिची मोठी बहीण रनिंग करायला जायच्या. तेव्हा बाया म्हणायच्या की खेळून आणि पळून काय होणार! शेवटी घरातच काम करावं लागणार आहे हे ध्यानात राहूद्या. सुमनच्या घरच्यांनी तिचं लग्न जमवलं आहे. वडील सांगतात की आता पुढचं शिक्षण सासरच्या लोकांवर अवलंबून आहे. त्यांनी शिकवू दिलं तर शिकायचं, नाही तर नाही. सुमनसारख्या गावातील अनेक मुलींची स्वप्नं सामाजिक बंधनांच्या आणि लग्नाच्या चक्रात रुतून बसली आहेत.

शाळेत जाणाऱ्या मुलींवरही खेळताना बंधनं येतात. मुलगी वयात आली की ती घराबाहेर राहिलेलं घरच्यांना पटत नाही आणि या ना त्या प्रकारे मुलींच्या खेळण्यावर निर्बंध येतात. शिकणाऱ्या मुलींनाही घरी आल्यावर घरकामाची जबाबदारी उचलावी लागते, मुलगे मात्र त्यांना हवे ते करायला मोकळे असतात. अशी मोकळीक, स्वतंत्र वेळ मुलींच्या वाट्याला येत नाही. सायकल चालवण्यासारख्या साध्या वाटणाऱ्या गोष्टीमध्येही मुलांना एक नियम तर मुलींना वेगळा - मुले कधीही सायकल चालवू शकतात, पण मुली नाही. या लिंगभेदभावाच्या वागणुकीमुळे मुलींचं जीवन एका चाकोरीत अडकून जातं, भरारी घेण्याचं बळ त्यांच्या पंखात येऊच दिलं जात नाही.

त्यांचं म्हणणं ऐकूया

घरकाम आणि शेतमजुरी या कामाच्या अव्याहत चक्रात अडकलेल्या तरूण स्त्रियांपर्यंत अनेक जीवनावश्यक संधी पोहोचत नाहीत. परिणामी त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. आरोग्याची समस्या ही त्यातील एक. त्यांना आपल्या शरीराबद्दल व आरोग्याबद्दल फारच कमी माहिती आहे असं दिसून आलं. लहान वयापासून शारीरिक कष्टांची सवय, पण पोषणयुक्त आहाराचा अभाव. त्यामुळे अशक्तपणा, एनिमियाचे प्रमाणही खूप आहे. प्रजनन आरोग्याच्या समस्यांवर तर बोललही जात नाही.

पितृसत्ताक मानसिकतेचा पगडा असल्यामुळे मुलींनी किती शिकावं आणि काय करावं ह्याचे निर्णय त्यांच्या हाती नसतात. कामाच्या जबाबदाऱ्यांमुळे शिक्षणाची हेळसांड होते. शिक्षणाच्या अभावी त्यांचं विश्वही घरापुरतं सीमित होतं. कौशल्य विकासाच्या संधींच्या अभावी, रोजगाराचे मोजके आणि कमी मजुरी देणारे पर्यायच त्यांच्या वाट्याला येतात.

स्त्रियांवरील हिंसाचार ही तर सार्वत्रिक समस्या आहे. अभ्यासाचा मुख्य भर या प्रश्नावर नसल्यामुळे आम्ही खूप खोलात जाऊन हिंसाचाराविषयी चर्चा केली नाही. पण बाकी विषयांच्या चर्चेत हिंसेचा संदर्भ येत होता. मुलींच्या बोलण्यामध्ये कौटुंबिक हिंसाचार व अत्याचाराचा नकळत उल्लेख केला जात होता. घरात आणि घराबाहेर होणाऱ्या हिंसेच्या कारणाने तरूण स्त्रियांवरची बंधने आणखी वाढतात, घराबाहेर जाण्यावर मर्यादा येते आणि त्यामुळे रोजगाराच्या नव्या संधी शोधता येत नाहीत.

कुटुंबात स्त्रियांवर लादले जाणारे निर्बंध हा इथल्या सामाजिक व्यवस्थेचा आणि पुरुषप्रधान मानसिकतेचा परिपाक आहे. ही व्यवस्था स्त्रियांना विकासाच्या संधी नाकारते आणि त्यांना मर्यादित क्षेत्रात एकसुरी जीवन जगायला भाग पाडते. स्वत:च्या हक्कांची जाणीव नसल्याने ही चाकोरी मोडण्याची क्षमताही बहुसंख्य स्त्रियांच्यात येत नाही. ही नकारात्मक स्थितीच कधी कधी त्याविरोधी आवाज उठवण्याची ऊर्जा देते. मनात सुप्तावस्थेत असलेल्या परिस्थितीवरचा रोष काहीजणी प्रकट करतात आणि चाकोरीबाहेर पडू पाहतात.

या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, तरूण स्त्रियांच्या हक्कांच्या पूर्ततेसाठी आणि त्यांना परिपूर्ण आयुष्य जगता यावे यासाठी काही गोष्टी करण्याची व बदलण्याची गरज आहे. पहिली गोष्ट म्हणजे, शिक्षणातले अडसर दूर व्हायला हवेत. कामामुळे मुलींच्या शिक्षणात खंड पडतो हे लक्षात घेऊन शिक्षण व्यवस्था अधिक लवचिक असली पाहिजे. सतत गैरहजर राहणारे विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर जाणार नाहीत, त्यांना शिकण्याच्या संधी पुन:पुन्हा मिळेल, ही खबरदारी शिक्षण यंत्रणेनं घ्यायला हवी. दुसरी गोष्ट, कौशल्य विकास प्रशिक्षणाची. सरकारही कौशल्य विकासावर भर देत आहे ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र या प्रशिक्षण कार्यक्रमात जी कौशल्ये समाविष्ट आहेत त्यात बदल करून तरूण स्त्रियांच्या रोजगार क्षमता विकसित करणाऱ्या विविध प्रकारच्या कौशल्यांचा समावेश करायला हवा. शिवाय शेतीतील कामाच्या अनुभवातून त्यांनी अवगत केलेल्या कौशल्यांची दखल घ्यायला हवी आणि ती अधिक विकसित करायला प्रशिक्षण दिले पाहिजे.

आभार

- **सोपेकॉम संस्थेतील अभ्यासकांची टीम**:
  प्रकाश रणसिंग, सीमा कुलकर्णी, वनिता पटले, मनिषा तोकले, रंजना कान्हेरे
- बीड जिल्ह्यातील वडवणी आणि नंदुरबार जिल्ह्यातील शहादा या दोन तालुक्यातल्या गावांमधील अभ्यासात सहभागी सर्व तरूण स्त्रिया
- **छायाचित्रे व लेखन**: विद्या कुलकर्णी
- **डिझाईन व मांडणी**: राजू देशपांडे

* सहभागी तरूण स्त्रियांची ओळख गोपनीय ठेवण्यासाठी लेखनात त्यांची नावे बदलली आहेत.

प्रकाशन
सोपेकॉम
१६ काळे पार्क, सोमेश्वरवाडी रस्ता, पाषाण, पुणे ४११००८.
soppecom@gmail.com